प्रश्न – चरित्रांचे स्वरूप सांगून मराठीतील काही चरित्रांची ओळख करून द्या?

दिनांक 13-3-2004

# चरित्र

कथा, कादंबरी, नाटक कविता या वाङ्मय प्रकाराप्रमाणे चरित्र हा प्रकारही अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असलेला दिसतो. आपणास प्रिय वाटणाऱ्या व्यक्तींचा मृत्यू झाल्यानंतर त्या व्यक्तींच्या स्मृती भविष्यकाळात कायम राहिल्या पाहिजे असे आपल्याला वाटते यातूनच चरित्र वाङ्मयाचा जन्म झाला. भारतात अनेक वर्षांपासून चरित्र लिहिली गेली. चरित्रात व्यक्तीचे गुणवर्णन असते. थोर पुरुषांचे स्मरण करण्याच्या इच्छेतच मूळ चरित्रलेखनाची प्रेरणा आहे. थोर व्यक्तींचे चरित्र वाचल्यामुळे आपल्याला एक दिशा मिळते, प्रेरणा मिळते. चरित्रकथनामध्ये एक प्रकारची विश्वसनीयता असते.

विश्वातील सर्वच माणसे चरित्रविषय होत नाहित. चरित्रविषय झालेल्या सर्वच व्यक्ती गुणवान असतात असेही म्हणता येत नाही. (नाटक, कादंबरीमुळे मात्र चरित्र थोडेसे कमीच असलेले दिसते.) चरित्र म्हणजे नुसता इतिहास नव्हे तर त्यात व्यक्तीचे गुणवर्णन असते. माणूस असत्प्रवृत्तीला तोंड कसे देतो, हे चरित्र वाचल्यानंतर कळते. त्यांना मोठेपणा प्राप्त होतो, त्यांना कोणत्याही परिस्थितीशी झगडावे लागते. असामान्य माणसे काहीतरी कार्य करण्यासाठी जन्माला येतात म्हणून त्यांचे चरित्र वाचले पाहिजेत या संदर्भात हरिभाऊ आपटे एका कवितेत असे म्हणतात,

"थोर महात्मे होऊनि गेले
चरित्र त्यांचे पहा जरा ।
आपण त्यांच्या समान व्हावे
हाच सापडे बोध खरा ॥"

थोर पुरुषांची चरित्रे ही शाश्वताची वाङ्मोल संपत्ती असते. थोरांच्या पाऊलावर पाऊल ठेवून त्यांचा मार्ग चोखाळणे हे सामान्यांचे कर्तव्य असते. त्यांच्या मार्गाचा, हेतूचा, ध्येयाचा उलगडा करून लोकांपुढे ठेवणे ही एक प्रकारची साधनाच असते असे दत्तो वामन पोतदार यांनी म्हटले. एकंदरीत चरित्र-लेखनाच्या मुळाशी विविध हेतू दिसत असले तरी 'सत्यपूर्ण व्यक्तिदर्शन' हाच चरित्राचा महत्वाचा हेतू आहे.

चरित्र म्हणजे एका व्यक्तीच्या जीवनाचा इतिहास होय. चरित्रात एका व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे वर्णन येते. व्यक्तीच्या जीवनात बाधक होते त्याचा व्यक्तीच्या जीवनात बाधक होत त्याचा विचार कसा केला हे चरित्र वाच-ल्यानंतर समजते. थोर व्यक्तींच्या जीवनापासून कोणतरी तत्वउपदेश होण्यासाठी चरित्र लिहिले जाते. व्यक्तिचित्रण, सत्य-दर्शन, गुण-दोष वर्णन, सुसंगतता, एकात्मता, भाषाशैली, वर्णनशैली, सूक्ष्म व मार्मिक द्रष्टी हे चरित्र वाङ्मयाचे व्यक्तिरेखा दिसत असतात. मुख्य घटक असलेली दिसून येतात.

## * मध्ययुगीन कालीन चरित्र —

थोर व्यक्तींच्या गुण कर्तृत्वाचे स्मरण करुन ठेवावे या उद्देशाने चरित्र लेखनाचा प्रारंभ झाला. चरित्र लेखनाचे मूळ फार प्राचीन आहे. पुराणात अनेक व्यक्तींचे चरित्रे संस्कृत मध्ये आपल्याला दिसतात. मराठी भाषेतील सर्वात प्राचीन चरित्र म्हणजे लीळाचरित्र होय. (इ.स. 1278) नाम-देवांनी लिहिलेली आदि व समाधी ही दोन ज्ञानेश्वर चरित्र विषयक प्रकरणे प्रसिद्ध आहेत. संत तुकाराम, संत एकनाथ आदि संतांनी पूर्वकालीन संतांची चरित्रे मोठ्या आदराने लिहिली. सरस्वती गंगाधरकृत 'गुरुचरित्र', महिपतीकृत भक्ति-विजय, भक्तलीलामृत, संतलीलामृत इत्यादी पद्य ग्रंथ मराठीतील चरित्रात्मक ग्रंथच होत. शिवाजी महाराजांवरील बखरी ह्याही शिवाजी चरित्रेच होत.

## * आधुनिक कालीन चरित्र —

इंग्रजी वाङ्मयाच्या अनुक-रणानेच मराठीत चरित्र लेखनाला सुरुवात झाली. आधुनिक काळात तर अनेकवी चरित्र वाङ्मयात भर घालते. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे मराठीतील (आधुनिक) आद्य चरित्रकार होत. चिपळूणकरांनी डॉ. जॉन्सनचे चरित्र लिहून आधुनिक चरित्र लेखनाचा पाया घातला. चिपळूणकरांनी हे चरित्र आपल्या 'निबंधमाले' तून प्रसिद्ध केले.

Scanned with CamScanner

इ.स. १८८५ ते इ.स. १९२० ह्या कालखंडात सुमारे तीनशे चरित्रे लिहिली गेली. साधुसंत, राजमहाराजे, मुत्सद्दी, देशभक्त शूरवीर, न्यायाधीश, शास्त्रज्ञ इ. चरित्रे या कालखंडात मोठ्या प्रमाणात लिहिले गेले. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी लिहिलेले 'सॉक्रेटीसचे चरित्र' वि. प. रानडे यांनी लिहिलेले, इत्यादी ठळक चरित्र अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असलेली दिसतात.

## * राजकीय व्यक्तींची चरित्रे -

1) महर्षी दादाभाई नौरोजी → ना. सी. फडके
2) पं. नेहरूंचे चरित्र → श्री. प्र. कानिटकर
3) मॅझिनीचे आत्मचरित्र → वि. दा. सावरकर
4) प्रिन्स बिस्मार्क → प्र. श्री. भावे.

## * पौराणिक पुरुषांची चरित्रे -

1) श्रीकृष्णचरित्र → श्री. गो. देसाई, महाइंभट
2) परशुरामचरित्र → श्री. म. माटे
3) शिवशंकर चरित्र → बापू मोडू मेहता
4) दयानंदांची चरित्र → सा. ह. फडके.

## * संत चरित्रे -

1) आद्यकवि मुकुंदराज → ना. रा. आजगावकर
2) श्री. ज्ञानदेव चरित्र → रा. व. दोडेकर
3) एकनाथ चरित्र → ना. रा. फाटक

## * राजकारणी व उद्योगवादी पुरुषांची चरित्रे -

1) गांधी चरित्र → श्री. द. नावेकर
2) सावरकर चरित्र → श्री. ल. करंदीकर
3) म. गो. रानडे चरित्र → न. र. फाटक.

* पाश्चात्य थोर व्यक्तींची चरित्रे –
1) गॅरिबाल्डी → न. चिं. केळकर
2) बिस्मार्क → न. चिं. केळकर
3) नेपोलियन → वि. ल. भावे
4) टॉलस्टॉय → वि. ल. भावे.

* ऐतिहासिक पुरुषांची चरित्रे –
1) थोरले बाजीराव चरित्र → ना. वि. बापट.
2) नाना फडणविसांचे चरित्र → श्री. वासुदेवशास्त्री खरे
3) झाशीच्या महाराणी लक्ष्मीबाई → द. बा. पारसनीस.
4) अहिल्याबाई होळकर → वि. ना. देव.
5) शिवाजी, संभाजी, राजाराम → राजारामशास्त्री भागवत.

* अलीकडची काही चरित्रे –
1) माधव ज्यूलियन → गं. दे. खानोलकर
2) श्री. केळकर चरित्र → द. न. गोखले
3) राजे छत्रपती → बाबासाहेब पुरंदरे
4) छ. संभाजी → वा. सी. बेंद्रे
5) नाना शंकरशेट → अनंत गोखले
6) याशिवाय अलीकडच्या काळात धनंजय कीर यांनी महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सावरकर यांच्यावर विस्तृतपणे चरित्रे लिहून चरित्र वाङ्मयात एक नवा मानदंड निर्माण केल्याचे दिसते.

* प्रस्तावना (डायरी) → एकनिष्ठ → प्रवास

* टिळकांच्या आठवणींचा संग्रह (1924) → स. वि. बापट

* हिम्मत बहादूर हैरन्स मॅकेन्झी (1923) → ना. सी. फडके
चरित्र ग्रंथात नाविन्य निर्माण करणारे पहिले चरित्रकार होय

इ. स. 1920 ला लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला. टिळकांच्या मृत्यू झाल्यानंतर त्यांच्यावर अनेक चरित्रे लिहियात आली टिळकांच्या चरित्रपैकी अतिशय महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे न. चिं. केळकरांचा 'टिळक चरित्र' हा ग्रंथ होय. टिळकांच्या दीर्घकाळ सहवासात लाभलेले थोर लेखक श्री. न. चिं. केळकर यांनी टिळक चरित्र तीन खंडात प्रकाशित केले. 1923 व 1928 ला हे आत्मचरित्र प्रकाशित झाले. हे त्रिखंडात्मक चरित्र जवळजवळ दोन हजार पानांचे आहे. न. चिं. केळकरांनी या चरित्राच्या रूपाने लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचे सार्वजनिक जीवन नसून तीस चाळीस वर्षांच्या महाराष्ट्राचा इतिहास वाचकासमोर ठेवला. चरित्रग्रंथात नायकाचे चित्रण जवळिकीने करण्यापेक्षा तत्कालीन इतर घटना, विचार इ. वर्णनाला चरित्रकाराने जेर महत्त्व दिले तर तो इतिहासही होत नाही ना चरित्रही होत नाही असा प्रकार काही प्रमाणात या चरित्रात दिसतो. या चरित्रात काही दोष जरी असले तरी केळकरांच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीमुळे हे चरित्र वाचताना कंटाळा येत नाही. हे मात्र आपणास मान्य करावे लागते.

1970 च्या दरम्यान कादंबरीच्या माध्यमातून चरित्र योग्य असा चरित्र लिहिण्याचा आणखी एक प्रयत्न गंगाधर गाडगीळांनी केला. गंगाधर गाडगीळ यांच्या 'दुर्दम्य' कादंबरीचा पहिला खंड 1 ऑगस्ट

1970 साली म्हणजे टिळक पुण्यतिथीला प्रसिद्ध झाला. तर दुसरा खंड 15 डिसेंबर 1971 साली प्रकाशित झाला. 'दुर्दम्य' नावाच्या चरित्रात्मक कादंबरीतून गाडगीळांनी टिळकांचे चरित्र सांगितले हा एक नवा असा प्रयोग असलेला दिसतो. तसे पाहिले तर 'दुर्दम्य' ही राजकीय कादंबरीही ठरू शकते पण गाडगीळांनी 'दुर्दम्य' ला चरित्र कादंबरी म्हटले आहे. या संदर्भात गाडगीळांनी आपली भूमिका विस्ताराने मांडली. चरित्रनायकाशी व त्याच्या काळाशी इमान राखण्याच्या भूमिकेतून तिची निर्मिती झाली आहे.

'दुर्दम्य' लिहिताना गाडगीळांनी टिळकांच्या चरित्राशी शक्य तेवढ्या प्रमाणात इमान राखले. टिळकांचे समग्र जीवन त्यातील विस्कळीतपणातूनही साकार व्हावे यासाठी क्रमशः घडणाऱ्या जीवनातील कोणतेही महत्त्वाचे भाग त्यांनी गाळला नाही. टिळकांच्या कार्याला अनेक केंद्रे आहेत. [illegible] राजकारणापासून ते गीतारहस्यापर्यंत या सर्व काळातील टिळकांच्या जीवनाचे दर्शन गाडगीळांनी घडविले. "टिळकांची जी एक कठोर व लोकप्रिय सार्वजनिक प्रतिमा आहे ती स्वीकारून गाडगीळांनी आपले लेखन व्यक्तीभोवती कुशल कारागिरीने उभारले आहे. ती प्रतिमा फोडून टिळकांच्या अंतरंगाचा ठाव घेण्याचा प्रयत्न फारसा केलेला नाही." असा आक्षेप [illegible] पत्रकारांनी केला. असे असले तरी टिळकांचे जीवन,

त्रिंबक कालीन समाज, त्यांचे विविध भेद, तत्कालीन राजकारणाचे विविध धागेदोरे, राजकर्त्यांचे खरे व वरवर दिसणारे स्वरूप या सर्वांचे काळजीपूर्वक 'दुर्दम्य' या चरित्रात्मक कादंबरीत केलेले वर्णन महत्त्वपूर्ण आहे.

* संदर्भ ग्रंथ —

1) चरित्र आणि आत्मचरित्र
→ डॉ. सदा कऱ्हाडे

2) प्रदक्षिणा खंड पहिला
→ कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 30

3) आस्वाद आणि आविष्कार
→ डॉ. प्रल्हाद वडेर

4) 'दुर्दम्य' जे स्वीकारलेली आव्हाने
→ वसंत पळशीकर (लोकप्रतिष्ठान नोव्हेंबर 1973) पृष्ठ 21

5) प्राचीन मराठीतील चरित्रलेखन
→ वसंत रामचंद्र नेरगावकर